पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - १७९**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **२१/०७/२०१५** वेळ – **सकाळी ११.०० वाजता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक **२१/०७/२०१५** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे - सभापती**
२) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
३) मा.गायकवाड संध्या सुरदास
४) मा.भालेकर शांताराम कोंडीबा ऊर्फ एस.के.बापु
५) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
६) मा.तरस बाळासाहेब जयवंत
७) मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८) मा.प्रसाद शेट्टी
९) मा.सौ.साळुंके सविता सुरेश
१०) मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
११) मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
१२) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१३) मा.काळे विमल रमेश

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.भोसले-मुख्य लेखापाल,मा.गावडे-सहआयुक्त,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.तुपे–सह शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.डोईफोडे,मा.कडूसकर,मा.दंडवते,मा.माछरे,मा.फुंदे,मा.दुरगुडे,मा.खोसे-सहा.आयुक्त,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.उबाळे-प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण,मा.कपिले,मा.थोरात,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.दांगट, मा.बरशेट्टी,मा.गलबले,मा.कांबळे,मा.औंभासे,मा.गट्टूवार,मा.गायकवाड,मा.रत्नपारखी-कार्यकारी अभियंता, मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी,मा.बोदाडे,मा.बैंडे-प्रशासन अधिकारी,मा.लावंड-कायदा अधिकारी, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –</u>**

विषय क्रमांक-२३) तरतूद वर्ग करणेबाबत–मा.सुनिता गवळी, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...
विषय क्रमांक-२४) तरतूद वर्ग करणेबाबत– मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

| | |
|---|---|
| विषय क्रमांक-२५) | ठराव क्र.११२२४ दि.३१/३/२०१५मध्ये दुरुस्ती करणेबाबत-मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-२६) | नाहरकत दाखला देणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-२७) | Special Olympic World Games, Los Angeles 2015 या स्पर्धेसाठी म.न.पा. परिसरातील निवड झालेल्या अपंग विद्यार्थी खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणेस मान्यता घेणेबाबत – मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-२८) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-२९) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३०) | सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील झोनिपु विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३१) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३२) | पिंपरी चिंचवड मनपाच्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात वाढ/घट करणेबाबत – मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३३) | महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१५ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३४) | निगडी गावठाण प्रभाग क्र. १३ मधील विविध विकास कामांसाठी अंतर्गत तरतूद वर्गीकरण करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३५) | प्रकल्प सल्लागारांना फी अदा करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३६) | कामांच्या तरतुदीमध्ये वर्गीकरण करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३७) | कामांच्या तरतुदीमध्ये वर्गीकरण करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-३८) | संत तुकाराम महाराज सोहळा दि.९/७/१५ रोजी आकुर्डी येथील मुक्कामी करिता ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणे कामास येणारे खर्चास मंजुरीबाबत |
| विषय क्रमांक-३९) | सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील इ क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत – मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |
| विषय क्रमांक-४०) | स्थापत्य उद्यान विभागातील सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य उद्यान विषयक कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव… |

विषय क्रमांक-४१) सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ब क्षेत्रिय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११८५५, दि.२३/०६/२०१५ विषय क्र.६१ चा ठराव रद्द करुन सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४३) तरतूद वर्ग करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४४) ब प्रभागातील सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४५) कामांच्या तरतुदीमध्ये वर्गीकरण करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४६) सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक वर्ग करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४७) सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक वर्ग करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४८) ब प्रभागातील सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ घट करणेबाबत - मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-४९) सन २०१४-१५ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५०) मनपाच्या मान्य व प्रचलित पद्धतीनुसार प्रकल्प सल्लागार यांना फी अदा करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५१) सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील क प्रभाग व क मुख्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जलशुद्धीकरण केंद्र, से.क्र.२३ येथे पाणी शुद्धीकरण प्रक्रियेसाठी द्रवरुप स्वरुपातील पॉली ऍल्युमिनियम क्लोराईड व पावडर पॉली ऍल्युमिनियम क्लोराईड पुरविणेबाबत...

विषय क्रमांक-५३) सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील फ क्षेत्रीय कार्यालयातील प्रभागातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.संध्या गायकवाड, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक-५४) एस.के.बापू फाऊंडेशन या संस्थेस मुदतवाढ देणेबाबत - मा.शांताराम भालेकर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

--------

ठराव क्रमांक – १२००१ विषय क्रमांक – १
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१८८/१५ दि.०९/७/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४४/२०१४-१५ मधील अ.क्र.२१ अन्वये, प्रभाग क्र.१४ भक्तीशक्ती उद्यान येथील से.क्र.२६ येथील नाल्याची सुधारणा करणेकामी मे.एस.डी.दौंडकर (नि.र.रु.२२,४०,८९७/- (अक्षरी र.रु.बावीस लाख चाळीस हजार आठशे सत्याण्णव) पेक्षा ३७.९८% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.१४,५९,२९५/- पर्यंत काम करुन घेणेकामी ठेकेदार यांचेबरोबर करारनामा करून आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००२ विषय क्रमांक – २
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थापत्य
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/३/कावि/६४/१५ दि.०९/७/२०१५

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१९/२०१४-१५ मधील काम क्र.१० अन्वये, प्र.क्र.२९ इंद्रायणीनगरमध्ये ठिकठिकाणी पुरुषांसाठी व महिलांसाठी मुता-या बांधणे मे.सचिन दत्तात्रय लकारे (नि.र.रु.९,८०,३८०/-) (अक्षरी र.रु.नऊ लाख ऐंशी हजार तिनशे ऐंशी फक्त) पेक्षा २३.४०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.७,८८,५२०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००३ विषय क्रमांक – ३
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – प्रशासन
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/३/कावि/७३९/२०१५ दि.१३/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.प्रिन्स झेरॉक्स, पिंपरी व मे.कॉपी लाईन यांचेकडून कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व सर्व्हेअर पदाचे लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका झेरॉक्सबाबत करारनामा न करता थेट पद्धतीने करुन घेतलेल्या कामास व त्याकरिता मे.प्रिन्स झेरॉक्स, पिंपरी यांना प्रश्नपत्रिका झेरॉक्सचे बीलापोटी र.रु.५,०८,५२८/- व मे.कॉपी लाईन, निगडी प्राधिकरण यांना पर्यायी व्यवस्था म्हणून ३ झेरॉक्स मशीन, वाहतूक खर्च व मनुष्यबळासह पुरविणेचे बीलापोटी र.रु.४३,०००/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००४ विषय क्रमांक – ४
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/७३३/१५ दि.१३/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य लेखापरिक्षण विभागाचे सन २०१५-२०१६चे मुळ अंदाजपत्रकात अस्थायी अस्थापनेसाठी र.रु.५०,०००/- तरतूद करणेत आली आहे. तरतूद करतेवेळी या विभागात एकच कोपा पासा/डी.टी.पी.ऑपरेटर होते. या विभागास नव्याने दोन ऑपरेटर देणेत आले आहेत. तसेच आदेश क्र.ई-गव्ह./कावि/१/३०२/२०१५ दि. २०/०६/२०१५ अन्वये र.रु.६,०८९/- विद्यावेतन अदा करणेस व फरक अदा करणेस मान्यता दिलेली आहे. त्यामुळे विद्यावेतन अदा करणेकामी अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील तरतूद अपुरी पडत असुन मुलेप विभागाकडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावरील र.रु.३,७२,००,०००/- तरतुदीमधून अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसूचि प्रकरण ७ मधील २(२) (ब) अन्वये र.रु.१,७०,०००/- तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००५ विषय क्रमांक – ५
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.ई-गव्हर्नन्स/११/कावि/६९/१५ दि.१३/०७/२०१५

विषय - सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कस् ऑफ इंडिया यांना इंटरनेट बँडविड्थसाठी मुदतवाढ देणेबाबत...

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००६ विषय क्रमांक – ६
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय
सुचक-मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक-मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/पीजी-१/कावि/५६८/२०१५ दि.१३/०७/१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयाकरीता आवश्यक असलेली प्रस्तावातील प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली विविध पदे ही मानधनावर ६ महिन्यांकरिता तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर भरणेस, तसेच सदर पदे वृत्तपत्रात जाहिरात देऊन भरणेस आणि सदर पदांना प्रस्तावातील प्रपत्र 'ब', प्रपत्र 'क' मध्ये नमूद केलेल्या अनुभवाप्रमाणे दरमहा एकत्रित मानधन रक्कम अदा करणेस आणि प्रस्तावातील प्रपत्र अ मधील १ ते २ करीता उमेदवार न मिळालेस सदर पदे भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००७ विषय क्रमांक – ७
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – ड क्षेत्रिय कार्यालय
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.डक्षे/३/कावि/२७८/१५ दि.७/७/२०१५

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४३,४४, ४५ व ४८ मधील नाले साफसफाई करुन गाळाची वाहतुक करणे या कामाची नि.नो.क्र.१/२०१५-१६ निविदा र.रु.४,५१,७४४/- वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करुन दर मागविण्यात आले आहे. सदरची निविदा दि.०५/०५/२०१५ रोजी उघडण्यात आली आहे. सदर निविदाचे अनुषंगाने मे.श्री.साईकृपा कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय र.रु.४,५१,७४४/-पेक्षा ३९.५०% कमी हे दर निविदेमध्ये सादर केलेले आहे. सादर केलेले दर हे लघुत्तम असल्याने व अंदाजपत्रकीय र.रु.४,५१,७४४/- पेक्षा ३९.५०% कमीने म्हणजेच र.रु.२,७३,३०५/- इतक्या रक्कमेची होत असल्याने सदरचे दर स्विकृत करणेत आले आहे. याकामी त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेत आलेला असुन कामाची तातडी लक्षात घेऊन ठेकेदारास कामाचे आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००८ विषय क्रमांक – ८
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/८२/१५ दि.१४/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ कार्यक्रमासाठी १८ माध्यमिक विद्यालयातील ८०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या १२४ व अंध व अपंग १० असे एकुण १३४ विद्यार्थ्यांना द्यावयाचे प्रोत्साहन पर रक्कम ५६,५०,०००/- व कार्यक्रम आयोजनासाठी येणारा अपेक्षित खर्च र.रु.४०,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस हजार फक्त) आगाऊ रक्कम मा.शिक्षणाधिकारी यांचे नावे अदा करणेस व सदरचा खर्च थेट पद्धतीने खुल्या बाजारातुन करारनामा न करता मान्यता देणेकामी तसेच सन २०१५-१६ मध्ये माध्यमिक शिक्षण विभागाकडील गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ या लेखाशिर्षावरील तरतुद अपुरी पडत असल्याने माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकात शालेय विद्यार्थी गणवेश या लेखाशिर्षावर करण्यात आलेली र.रु.२,७५,००,०००/- या रकमेतुन गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ या लेखाशिर्षावर र.रु.२०,००,०००/- लाख तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२००९ विषय क्रमांक – ९
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – अ क्षेत्रीय कार्यालय विद्युत
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षे/वि/कावि/१६८/२०१५ दि.२९/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दि.२/६/१५ रोजी मा.स्थायी समिती सभागृहात मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सभा घेणेत आली होती. सदर सभेत संत तुकाराम महाराज पालखी सोहळा मुक्कामाचे ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ध्वनिक्षेपण व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, जनित्र संच व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. व्यवस्था व वारकरी मुक्कामाचे ठिकाणी जनित्र संच सहित प्रकाश व्यवस्था करणे आवश्यक आहे. सदर कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास अंदाजे र.रु.४,६९,२७३/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम हे निविदा पुर्व स्विकृत दराप्रमाणे मे.विजय इलेक्ट्रिकल्स & जनरेटर यांचेकडून निविदा नोटीस क्र. १/५९ – २०१४/१५ चे मंजुर दर १% कमी प्रमाणे सदरचे काम व येणा-या खर्चास मंजुरीकरीता सदरचा विषय करारनामा न करुन पुर्व निविदा स्विकृत दराने करणेकरीता मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१० विषय क्रमांक – १०
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – उद्यान विद्युत
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.वि/उद्यान/१८६/१५ दि.१०/७/२०१५

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिं.चिं. मनपाचे शहिद तुकाराम ओंबाळे उद्यान वेणुनगर वाकड येथे सिंगल फेज वीजमीटर घेणेकामी करारनामा न करता र.रु.१२१०/- (अक्षरी र.रु.एक हजार दोनशे दहा फक्त) म.रा.वि.वि.कं. मर्या. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०११ विषय क्रमांक – ११
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – उद्यान-विद्युत
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.उद्यान/वि/१८७/१५ दि.१०/७/२०१५

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिं.चिं. मनपाचे औंध ते रावेत बी.आर.टी. रस्त्याचे सुशोभिकरण करणेकामी ताथवडे मनपा शाळेजवळ थ्री फेज वीजमीटर घेणेकामी करारनामा न करता र.रु.२०१०/- (अक्षरी र.रु.दोन हजार दहा फक्त) म.रा.वि.वि.कं. मर्या. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१२ विषय क्रमांक – १२
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – उद्यान विद्युत
सुचक-मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक-मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जावक क्र.उद्यान/वि/१८८/१५ दि.१०/७/२०१५

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिं.चिं. मनपाचे औंध ते रावेत बी.आर.टी.एस. रस्त्याचे सुशोभिकरण करणेकामी ताथवडे राजीव गांधी बिजनेस स्कुलजवळ थ्री फेज वीजमीटर घेणेकामी करारनामा न करता र.रु.२०१०/- (अक्षरी र.रु.दोन हजार दहा फक्त) म.रा.वि.वि.कं. मर्या. यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१३ विषय क्रमांक – १३
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – उद्यान
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/४ए/कावि/४८३/२०१५ दि.१४/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा उद्यान विभागाचे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये खेळणी दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षावर र.रु.३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) तरतुद करणेत आली आहे. तथापि खेळणी दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षावर र.रु.३०,००,०००/- तरतुद अपुरी पडत असल्याने या लेखाशिर्षावर र.रु.१९,००,०००/- वाढीव रकमेची आवश्यकता आहे. सबब सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील उद्याने नुतनीकरण व विकसीत करणे या लेखाशिर्षामधुन र.रु.१९,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणीस लाख फक्त) खेळणी दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१४ विषय क्रमांक – १४
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – मुख्यलेखापरिक्षण
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/९२/१५ दि.९/७/२०१५

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२२.६.२०१५ ते दि.२८.६.२०१५ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/९२/२०१५ दि.०९.०७.२०१५ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१५ विषय क्रमांक – १५
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – स्थानिक संस्था कर
सुचक-मा.बाळासाहेब तरस अनुमोदक-मा.विनायक गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्थासंक/६/कावि/१९०/१५ दि.१३/०७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दै.लोकमत व दै.सकाळ या वर्तमानपत्रांची विशेष रोटेशन नुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीचे बिल अदा करणेकरिता संबंधितांना अदा करावयाचे एकुण र.रु.२८,१९२/- (अक्षरी र.रु.अठ्ठावीस हजार एकशे ब्याण्णव फक्त) च्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१६ विषय क्रमांक – १६
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – निवडणूक
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.निवडणूक/१/कावि/३०८/१५ दि.१४/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे प्रभाग क्र.४३ जागा अ चे रिक्त जागेकरीता झालेल्या निवडणूकीसाठी, निवडणूक विभागाकडून प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे एकूण र.रु.५,०९,६८२/- (अक्षरी र.रु.पाच लाख नऊ हजार सहाशे ब्याऐंशी फक्त) इतका खर्च विविध कामांकरीता झालेला असून सदर झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१७ विषय क्रमांक – १७
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – झोनिपू स्थापत्य
सुचक –मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.अनिता तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/२२८/१५ दि.१५/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील निविदा नोटीस क्र.३/२०१४-१५ मधील अ.क्र.१२ अन्वये, प्रभाग क्र.२९ गवळीमाथा झोपडपट्टीतील संडास ब्लॉक नं. १ (१६ संडास) पाडून २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी मे.सिद्धीकी प्लंबींग अँड ड्रेनेज सिव्हील कॉन्ट्रॅक्टर (निविदा रक्कम रुपये ३२,६०,१०५/- (अक्षरी र.रु. बत्तीस लाख साठ हजार एकशे पाच फक्त) पेक्षा ५.१०% कमी) दराची निविदा मंजुर दराने रक्कम रुपये ३०,९३,८४०/- प्रमाणे काम करुन घेणेस तसेच निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१८ विषय क्रमांक – १८
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक-मा.हिरानंद आसवाणी अनुमोदक-मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/८/कावि/५०/१५ दि.३०/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रिडा समिती सभा ठ.क्र.१०७ दि.१५/७/२०१५ नुसार, महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्र.१८ प्रमाणे आंतराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे कु.सुशांत गणेश तरवडे याची बँकॉक थायलँड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) कु.सुशांत गणेश तरवडे यांस आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०१९ विषय क्रमांक – १९
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक–मा.संध्या गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. क्रीडा/८/कावि/४९/१५ दि.३०/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रिडा समिती सभा ठ.क्र.१०८ दि.१५/७/२०१५ नुसार, महापालिकेचे क्रीडा धोरणातील भाग १ ड शिष्यवृत्ती मधील ३ पान क्र.१८ प्रमाणे आंतराष्ट्रीय स्तरांवरील खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे यामध्ये नमुद केलेप्रमाणे कु.संदिप जनार्दन भापकर याची बँकॉक थायलंड येथे दिनांक १९/०६/२०१५ ते २१/०६/२०१५ रोजी होणा-या इंटरनॅशनल योगासन ५ व्या योगासन स्पोर्टस् चॅम्पियनशिपकरीता योगा फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेच्यावतीने निवड झाली असल्यामुळे सदर स्पर्धेसाठी उपस्थित राहणेकामी र.रु.४१,२५०/- (अक्षरी र.रु.एक्केचाळीस हजार दोनशे पन्नास फक्त) कु.संदिप जनार्दन भापकर यांस आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक – १२०२० विषय क्रमांक – २०
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक-मा.शांताराम भालेकर अनुमोदक-मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. क्रीडा/८/कावि/४५/१५ दि.२५/५/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.क्रिडा समिती सभा ठ.क्र.१०९ दि.१५/७/२०१५ नुसार, मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/०१/२०१४ अन्वये क्रीडा धोरण पा.क्र.१४ वरील क्रीडा विभागाकडील धोरण नियमावली भाग क्र.०१ ड शिष्यवृत्ती व आर्थिक मदतीकरिता नियम क्रमांक-०३. आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे नुसार म.न.पा. परिसरातील जे खेळाडू एशियन, राष्ट्रकुल कॉमनवेल्थ ऑलिम्पिक अशा नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होतात. अशा खेळाडूंना प्रवास

खर्च, प्रवेश शुल्क निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त र.रू.१,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. अशी महापालिका क्रीडा धोरणामध्ये मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच क्रीडा धोरण, भाग क्र.१ - फ - क्रीडा प्रशिक्षण केंद्र - यामध्ये अ.क्र.०२ साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देणे यात भाग-३ – इतर अँडव्हेंचर स्पोर्ट्स – स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक असे वर्गीकरण करून ज्या इव्हेंटच्या स्पर्धा घेणे शक्य आहे, त्यांच्या स्पर्धा घेऊन इतर इव्हेंटचे प्रात्याक्षिक दाखविण्याचा प्रयत्न व्हावा. यामुळे या खेळांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळेल. तसेच प्रशिक्षण राबविणे, साहसी सप्ताह भरविणे व साहसी क्रीडा प्रकारांना पुरस्कार देण्यात यावेत. मोहिमांसाठी आर्थिक मदत तसेच साहित्य खरेदी व इतर बाबींसाठी आर्थिक मदत करण्यात यावी. भविष्यात विचार करण्यात येईल. असे नमूद केलेले आहे.

परंतु क्रीडा धोरणामध्ये, म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतचे नियम व अटी निश्चित केलेले नाहीत. म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमूद केलेप्रमाणे नियम व अटी निश्चित करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – १२०२१ | विषय क्रमांक – २१ |
| दिनांक – २१/०७/२०१५ | विभाग – क्रीडा |
| सुचक-मा.बाळासाहेब तरस | अनुमोदक-मा.विनायक गायकवाड |

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. क्रीडा/८/कावि/५६/१५ दि.०३/०६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रिडा समिती सभा ठ.क्र.११० दि.१५/७/२०१५ नुसार, श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांची दि. १८/०५/२०१५ ते ०५/०६/२०१५ या कालावधीमध्ये माऊंट गंगोत्री ३, (उंची ६,५५७ मी.उंच) येथील गिर्यारोहण मोहिमे करिता निवड करणेत आलेली असलेने, सदर मोहिमेकरिता इंडियन माऊंटनेरिंग फेडरेशन, दिल्ली व सदर मोहिमेकरिता इंडियन माऊंटनेरिंग फेडरेशन, दिल्ली यांची मान्यता घेतलेली असून, **3 Point Adventure, Uttarakhand** ही संस्था या मोहिमेची सुत्रे व जबाबदारी स्वीकारत असून, या संस्थेमार्फत ही मोहिम पार पाडणे करिता र.रू.१,५०,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख पन्नास हजार फक्त) इतके आर्थिक सहाय्य मिळणेबाबत मागणी केली आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१ दि.१८/०१/२०१४ अन्वये क्रीडा धोरण पा.क्र.१४ वरील क्रीडा विभागाकडील धोरण नियमावली भाग क्र.०१ ड शिष्यवृत्ती व आर्थिक मदतीकरिता नियम क्रमांक-०३. आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे नुसार म.न.पा. परिसरातील जे खेळाडू एशियन, राष्ट्रकुल कॉमनवेल्थ ऑलिम्पिक अशा नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होतात. अशा खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त र.रू.१,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. अशी महापालिका क्रीडा धोरणामध्ये मान्यता देण्यात आलेली आहे.

निमंत्रित स्पर्धेसाठी जाणा-या आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी सदर आर्थिक सहाय्य देय राहणार नाही. महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार अथवा पिंपरी चिंचवड म.न.पा. यापैकी एकाच प्राधिकृत संस्थेकडून स्पर्धा प्रवास निवास, भोजन खर्च देय राहिल. तसेच लेखी पत्र संबंधित राज्य,राष्ट्रीय क्रीडा संघटनेकडून देणे बंधनकारक राहिल. अशी महापालिका सभेने क्रीडा धोरणास मान्यता दिलेली आहे.

पिंपरी चिंचवड म.न.पा. क्रीडा धोरण, भाग क्र.१ - फ - क्रीडा प्रशिक्षण केंद्र - यामध्ये अ.क्र.०२ साहसी क्रीडा प्रकारांना उत्तेजन देणे यात भाग-३ – इतर अँडव्हेंचर स्पोर्ट्स – स्पर्धात्मक व अस्पर्धात्मक असे वर्गीकरण करून ज्या इव्हेंटच्या स्पर्धा घेणे शक्य आहे, त्यांच्या स्पर्धा घेऊन इतर इव्हेंटचे प्रात्याक्षिक दाखविण्याचा प्रयत्न व्हावा. यामुळे या खेळांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळेल. तसेच प्रशिक्षण राबविणे, साहसी सप्ताह भरविणे व साहसी क्रीडा प्रकारांना पुरस्कार देण्यात यावेत. मोहिमांसाठी आर्थिक मदत तसेच साहित्य खरेदी व इतर बाबींसाठी आर्थिक मदत करण्यात यावी. भविष्यात विचार करण्यात येईल. असे नमूद केलेले आहे.

परंतु म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित केलेल्या नाहीत. याबाबत मा.आयुक्त यांची मा.महापौर यांचेशी दि.१२/५/२०१५ रोजी समक्ष चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये मा.आयुक्त यांनी क्रीडा धोरणामध्ये म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी ,कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित करणेस, मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य अदा करण्यात यावे,असे ठरले होते.

त्यानुसार तातडीची बाब म्हणून मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र. क्रीडा/३/कावि/२०१५ दि.१३/५/२०१५ अन्वये श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य र.रू.१,००,०००/-,(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) **3 Point Adventure Agency** यांचे नावे धनादेशाव्दारे आर्थिक सहाय्य अदा करण्यात आलेले आहे.

क्रीडा धोरणामध्ये म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा. अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित करणेस, मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/३/कावि/२०१५ दि.१३/५/२०१५ अन्वये श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य र.रू.१,००,०००/-,(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) **3 Point Adventure Agency** यांचे नावे धनादेशाव्दारे अदा केल्याने यास मा.क्रीडा समिती सभेमार्फत मा.स्थायी समिती सभा व मा.महापालिका सभेची कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब क्रीडा धोरणामध्ये म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा करणे बाबतच्या नियम व अटी निश्चित करणेस, मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/३/कावि/२०१५ दि.१३/५/२०१५ अन्वये श्री.अनिल चंद्रकांत वाघ, फायरमन अग्निशामक विभाग यांना माऊंट गंगोत्री ३ या गिर्यारोहण मोहिम २०१५ करिता आर्थिक सहाय्य र.रू.१,००,०००/-,(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) **3 Point Adventure Agency** यांचे नावे धनादेशाव्दारे अदा केल्याने त्यास कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०२२ विषय क्रमांक – २२
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – क्रीडा
सुचक –मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.विमल काळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. क्रीडा/७/कावि/७६/१५ दि.२१/०१/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रिडा समिती सभा ठ.क्र.१११ दि.१५/७/२०१५ नुसार, मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/ १८८/२०१२ दि.०४/०७/२०१२ मध्ये नमूद केलेप्रमाणे क्रीडा विभागांतर्गत खेळाडू दत्तक योजना २०१४-१५ (तिसरी बॅच) चे अर्जांवर निर्णय घेणेकामी मा.सहा.आयुक्त (क्रीडा) यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/६०७/२०१४, दि.०३/११/२०१४ नुसार क्रीडा अधिकारी, खेळाडू दत्तक योजना प्रमुख व संबंधित खेळाचे क्रीडा पर्यवेक्षक यांनी प्रस्तावात नमुद एकूण १६ अर्जांपैकी १५ खेळाडूंचे अर्ज पात्र करुन खेळाडू दत्तक योजना २०१४-१५ चा लाभ हा २ वर्षाकरिता देणेस व त्याकामी येणा-या र.रु.५०,२४,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख चोवीस हजार फक्त) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले –</u>**

ठराव क्रमांक –१२०२३ विषय क्रमांक – २३
दिनांक – २१/०७/२०१५
सुचक –मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.संध्या गायकवाड यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड क्षेत्रीय कार्यालय व मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.१३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०२४ विषय क्रमांक – २४
दिनांक – २१/०७/२०१५
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०२५ विषय क्रमांक – २५

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र. ११२२४ दिनांक ३१/३/२०१५ मधील "र.रु.१४,८३,०१४/- पर्यंत" हा मजकूर वगळण्यात यावा व त्याऐवजी "र.रु.२०,२६,६२७/- पर्यंत" हा मजकूर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०२६ विषय क्रमांक – २६

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

श्री.संदीप ज्ञानोबा गव्हाणे, लिपीक, स्थानिक संस्था कर विभाग हे दिनांक २३/०२/२००० पासून मनपामध्ये काम करीत आहेत. श्री.संदीप ज्ञानोबा गव्हाणे यांना पवना सहकारी बँक मर्यादीत चिंचवड या बँकेच्या संचालक पदावर काम करण्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम १६ (३) नुसार कार्यालयीन कामाची वेळ सोडून काम करणेस तसेच ते बँकेकडून कोणताही आर्थिक मोबदला घेणार नाहीत या अटीवर कार्य करणेस त्यांचे विनंती अर्जानुसार ना हरकत दाखला देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०२७ विषय क्रमांक – २७

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड म.न.पा.परिसरातील खालील ४ अपंग विद्यार्थी खेळाडूंची **Special Olympic World Games ,Los Angeles 2015 या स्पर्धेसाठी निवड झालेली असून त्यांचा तपशील खालील प्रमाणे**

| **अ.क्र.** | **विद्यार्थी खेळाडूंचे नाव** | **पत्ता** | **खेळ प्रकार** | **शाळेचे नाव** |
|---|---|---|---|---|
| १ | निशा चिंतोळे | निगडी प्राधिकरण | व्हॉली बॉल | साई संस्कार संस्था,चिंचवड |
| २ | सचिन शर्मा | मोशी | बॅडमिंटन | साई संस्कार संस्था,चिंचवड |
| ३ | वर्षा नगराळे | संभाजीनगर चिंचवड | व्हॉली बॉल | कामायनी विद्यालय ,निगडी |
| ४ | भरत पाटील | भोसरी | सायकलिंग | कामायनी विद्यालय ,निगडी |

पिंपरी चिंचवड म.न.पा.परिसरातील वरील ४ अपंग विद्यार्थी खेळाडूंची Special Olympic World Games,Los Angeles 2015 या स्पर्धेसाठी निवड झाली असून Special Olympic World Summer Games या स्पर्धा दि. २५/७/२०१५ ते दि.२/८/२०१५ या काळात Los Angeles, California,USA येथे आयोजित केल्या असून सदर ४ खेळाडू दि.२०/७/२०१५ रोजी मुंबई येथून निघणार आहेत.

म.न.पा.क्रीडा धोरणात,आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे अशी तरतूद आहे.या तरतुदी नुसार वरील पिंपरी चिंचवड म.न.पा. परिसरातील ४ अपंग विद्यार्थी खेळाडूंची Special Olympic World Games ,Los Angeles 2015 या करिता निवड झाल्याने, त्यांना स्पर्धेसाठी उपस्थित राहणे करिता,प्रवास,भोजन,स्पर्धा कीट इ.करिता प्रत्येकी र.रु.१,००,०००/- अथवा म.न.पा.नियमानुसार आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०२८ विषय क्रमांक – २८

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

क क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०२९ विषय क्रमांक – २९

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

क क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३० विषय क्रमांक – ३०

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील झोनिपु विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३१ विषय क्रमांक – ३१

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

“ड” प्रभाग व “ड” मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करावयाचा आहे. तरी त्याप्रमाणे बदल होणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.११,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक –१२०३२ विषय क्रमांक – ३२

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिं.चिं.म.न.पा.च्या सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.१६,८०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३३ विषय क्रमांक – ३३

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ,इंदिरानगर,चिंचवड,पुणे ४११०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१५ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र प्रेमलोक पार्क चिंचवड पुणे ४११०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१४ (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करण्यात येत आहे.

सदर स्पर्धा अनुषंगाने, नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर चिंचवड, पुणे ४११०३३ यांनी खालील प्रमाणे स्पर्धेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

| अ क्र | खर्चाचा तपशिल | अंदाजे खर्च र.रू. |
|---|---|---|
| | स्पर्धेत सहभागी होणा-या अंदाजे खेळाडूंची संख्या = २०० खेळाडू | |
| १ | पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन फी (पी.डी.सी.ए.)फी | ३,०००/- |
| २ | रेफरी मानधन | १७,४००/- |
| ३ | कॅरम बोर्ड पूर्ण सेट भाडे-१६ बोर्ड X३ दिवस X प्रति दिन भाडे र.रु.४५० =२१६००/- | २१,६००/- |
| ४ | कॅरम बोर्ड वाहतूक भाडे ,(पुणे-चिंचवड –पुन्हा पुणे) | २,८००/- |
| ५ | कॅरम सेटिंग इलेक्ट्रिशियन मानधन | ३,०००/- |
| ६ | कॅरम ड्रॉ चार्जेस | ५००/- |
| ७ | कॅरम पावडर ६ किलो | १,२००/- |
| ८ | स्टेशनरी | २,०००/- |
| ९ | पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर खर्च =५ बॅनर १६२००/- | १६,२००/- |
| १० | हॅंडबिल,झेरॉक्स खर्च ,निमंत्रण पत्रिका छपाई ,प्रमाणपत्र छपाई खर्च | ५०००/- |
| ११ | रोख बक्षिसे | १,३६,०००/- |
| १२ | स्पर्धा उद्घाटन,समारोप समारंभ ,पाहुणे पदाधिकारी सत्कारार्थ बुके खरेदी ,हार नारळ खर्च | ५०००/- |
| १३ | स्पर्धा उदघाटन ,स्पर्धा काळ .स्पर्धा समारोप प्रसंगी पाहुणे पदाधिकारी रेफरी,,खेळाडू ,पंच यांकरिता चहापान अल्पोपहार,बिसलेरी पाणी व्यवस्था इ. | २०,१४०/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | ट्रॉफीज ,सन्मान खर्च=१)पुरुष गट १ ते ८ ट्रॉफीज,२)महिला गट १ ते ४ ट्रॉफीज ३)जेष्ठ नागरिक गट १ ते ४ ट्रॉफीज=एकूण १६ ट्रॉफीज व १० सन्मान चिन्हे | २५,०००/- |
| १५ | स्टेज,मंडप व्यवस्था व टेबल खुर्च्या खर्च = खुर्च्या विदाउट हॅंडल =१०० ,टेबल क्लॉथ वुईथ टेबल =४ | ५०,०००/- |
| १६ | विद्युत ,स्पिकर ,माईक व जनरेटर व्यवस्था खर्च | २०,०००/- |
| १७ | पत्रकार परिषद चहापान खर्च | ३,०००/- |
| १८ | प्रसिद्धी साठी फोटो खर्च | ५,०००/- |
| १९ | स्पर्धा अनुषंगाने इतर किरकोळ खर्च | ५,०००/- |
| | एकूण र.रु. | ३,४१,८४०/- |

तरी वरील प्रमाणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ,इंदिरानगर,चिंचवड,पुणे ४११०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१५ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र प्रेमलोक पार्क चिंचवड पुणे ४११०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१४ (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस येणा-या अंदाजे र.रु.३,४१,८४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित प्रभाग स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/-हा संबंधित प्रभाग विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत र.रू.२,७१,८४०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई, पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेसं मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३४ विषय क्रमांक – ३४

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

सन २०१५-१६ चे मंजूर अंदाजपत्रकात मुळातच प्रथम प्राधान्याने करावयाच्या ब-याचशा विकास कामांसाठी अपुरी तरतुद ठेवणेत आली असल्याने त्या कामांची निविदांची कार्यवाही करता येणे शक्य नाही. सबब अशा प्रथम प्राधान्याने करावयाच्या कामांचे तरतुदीमध्ये वाढ करणे अत्यावश्यक व क्रमप्राप्त आहे. ज्यायोगे या कामांच्या निविदा काढणे सुलभ होईल. तथापि, अशा कामांसाठीच्या तरतुदीमध्ये वाढ करावयाची झाल्यास दुय्यम प्राधान्याने करावयाच्या ज्या कामांसाठी सुद्धा अपु-या तरतुद करणेत आलेल्या आहेत, त्या कमी करुन म्हणजेच त्यामध्ये घट करुन त्या रकमा वाढीसाठी वर्ग करता येणे शक्य नाही. त्याअनुषंगाने निगडी गावठाण प्रभाग क्र.१३ मधील एकूण तीन विविध विकास कामांसाठी कराव्या लागणा-या वाढ आणि घट याबाबतचा प्रस्तावात नमूद तपशिल तक्ता (परिशिष्ठ) नमूद प्रमाणे वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४१,०५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला. प्र

--------

ठराव क्रमांक –१२०३५ विषय क्रमांक – ३५

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकल्प राबविणेत येत आहेत. सदर प्रकल्प गुणवत्तेने व वेळेत पुर्ण होणेसाठी व मनपाकडील उपलब्ध अभियंत्यांचा विचार करुन सदर प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार (Project Management Consultant) यांची नेमणुक करणेत येते. याकामी यापुर्वी मा.स्थायी समितीने अशा प्रकारचे प्रकल्प सल्लागार नेमताना प्रकल्पाच्या किंमतीच्या २.३५% + सेवाकर अशी फी अदा करणेस वेळोवेळी मान्यता दिलेली आहे. तथापि मागील ३-४ महिन्यापुर्वी मा.स्थायी समितीमध्ये सल्लागारांना सल्लागार फी म्हणुन २.३५% द्यावी व सेवाकर देऊ नये असा निर्णय झाला असल्याने प्रकल्प सल्लागारांना काम करणे अडचणीचे होते आहे. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व सल्लागारांना चालु व भविष्यातील कामांसाठी यापुर्वीच्या पद्धतीनुसारच प्रकल्प किंमतीच्या २.३५% + सेवाकर अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३६ विषय क्रमांक – ३६

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

सांगवी प्रभाग क्र.५९ मधील UTWT व TWT पद्धतीचे कॉंक्रीट रस्ते प्रस्तावित असून सदरच्या कामाकरिता आवश्यक तरतूद प्रस्तावात नमूद कामातून वर्ग करुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.३,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३७ विषय क्रमांक – ३७

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

सांगवी प्रभाग क्र.५९ मधील UTWT व TWT पद्धतीचे कॉंक्रीट रस्ते प्रस्तावित असून सदरच्या कामाकरिता आवश्यक तरतूद प्रस्तावात नमूद कामातून वर्ग करुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.४,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३८ विषय क्रमांक – ३८
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – अ क्षेत्रीय कार्यालय, विद्युत
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अक्षे/वि/कावि/१६८/२०१५ दि.२९/६/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

दि.२/६/१५ रोजी मा.स्थायी समिती सभागृहात मा.महापौर यांचे अध्यक्षतेत सभा घेणेत आली होती. सदर सभेत संत तुकाराम महाराज सोहळा मुक्कामाचे ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात ध्वनिक्षेपण व्यवस्था, प्रकाश व्यवस्था, जनित्र संच व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. व्यवस्था व वारकरी मुक्कामाचे ठिकाणी जनित्र संच सहित प्रकाश व्यवस्था करणे आवश्यक आहे. वरील कामांची अंदाजपत्रक तायर करण्यात आले असून त्यास अंदाजे र.रु.४,६९,२७३/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम हे निविदा पुर्व स्विकृत दराप्रमाणे मे.विजय इलेक्ट्रिकल्स & जनरेटर यांचेकडून निविदा नोटीस क्र.१/५९-२०१४/१५ चे मंजुर दर १% कमी प्रमाणे सदरचे काम व येणा-या खर्चास मंजुरीकरीता सदरचा विषय करारनामा न करुन पुर्व निविदा स्विकृत दराने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०३९ विषय क्रमांक – ३९
दिनांक – २१/०७/२०१५
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

इ क्षेत्रिय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करावयाचा आहे. तरी प्रस्तावात नमुदप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.२,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४० विषय क्रमांक – ४०
दिनांक – २१/०७/२०१५
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.४०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४१ विषय क्रमांक – ४१

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

ब क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करावयाचा आहे. तरी प्रस्तावात नमूदप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.१,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४२ विषय क्रमांक – ४२

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती ठराव क्र.११८५५, दि.२३/०६/२०१५, विषय क्र.६१ चा ठराव रद्द करुन प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे "ड" प्रभाग व "ड" मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करावयाचा आहे. तरी त्याप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.७,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४३ विषय क्रमांक – ४३

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे "ब" क्षेत्रीय कार्यालय व मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.२०,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४४ विषय क्रमांक – ४४

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

"ब" प्रभागातील सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४५ विषय क्रमांक – ४५

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

सांगवी प्रभाग क्र.५९ मधील UTWT व TWT पद्धतीचे काँक्रीट रस्ते प्रस्तावित असून सदरच्या कामाकरिता आवश्यक तरतूद प्रस्तावात नमूद कामातून वर्ग करुन मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४६ विषय क्रमांक – ४६

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.८,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४७ विषय क्रमांक – ४७

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे स्थापत्य इ क्षेत्रीय विभागाअंतर्गत तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.(वाढ/घट र.रु.९,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४८ विषय क्रमांक – ४८

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

“ब” प्रभागातील सन २०१५-१६ च्या मुळ अंदाजपत्रकातील स्थापत्य विकास कामांच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

(वाढ/घट र.रु.४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०४९ विषय क्रमांक – ४९

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकामधील प्रस्तावात नमूदप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.५०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०५० विषय क्रमांक – ५०

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील प्रजिमा-३१ या रस्त्याचे डांगे चौक ते शिवाजी चौक, हिंजवडी पर्यंत रस्ता रुंदीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम करणेसाठी मनपाच्या सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकात तरतुद करणेत आलेली आहे. हिंजवडी येथील वाहतूक कोंडी सोडविणेसाठी सदर रस्त्याचे मजबुतीकरण व रुंदीकरण करणे आवश्यक आहे. याप्रकारचे कामाचा अनुभव असणारे मे.इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स (प्रा) लि. हे प्रकल्प सल्लागार (PMC) आहे. तरी मनपाच्या मान्य व प्रचलित पद्धतीनुसार प्रकल्प सल्लागार यांना निविदा रकमेच्या २.३५% (निविदा पूर्व ०.९% व निविदा पश्चात १.४५%) फी अधिक सेवाकर अशी फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०५१ विषय क्रमांक – ५१

दिनांक – २१/०७/२०१५

सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.संध्या गायकवाड,मा.सुनिता गवळी यांचा प्रस्ताव...

"क" प्रभाग व "क" मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये प्रस्तावात नमूदप्रमाणे कामाच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.३,००,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०५२ विषय क्रमांक – ५२

दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – जलशुद्धीकरण केंद्र से.२३

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. पापु/जशुके/२८४/१५ दि.२१/७/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका जलशुद्धीकरण केंद्र से.क्र.२३ येथे पाणी शुद्धीकरण प्रक्रियेसाठी द्रवरुप स्वरुपातील पॉली ॲल्युमिनियम क्लोराईड व पावडर स्वरुपातील पॉली ॲल्युमिनियम क्लोराईडचा

पुरविणे या कामाचा आदेश संदर्भ क्र.४ अन्वये देण्यात आला आहे. सदर निविदेत मे.एस.व्ही.एस. केमिकॅल व मे.केमिकॅल पिपल यांना अनुक्रमे ६०% व ४०% प्रमाणे परिमाण पुरवणे आदेश देण्यात आले आहे. निविदा अटी व शर्तीनुसार आवश्यकता असल्यास निविदा दराने ५०% जादा परिमाण पुरविणेची अट निविदेमध्ये घेणेत आलेली आहे. या वर्षीसाठी पी.ए.सी. लिक्विड व पावडर खरेदी करणेसाठी अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. चालू निविदेतील करारनामा नुसार ठेकेदार यांनी वाढीव ५०% पी.ए.सी. लिक्विड व पावडर आहे. त्याच निविदा दराने म्हणजेच अनुक्रमे लिक्विड पी.ए.सी. चा दर र.रु.१२,६००/- प्रति मे.टन व पावडर पी.ए.सी. चा दर र.रु.३१,१५० प्रति मे.टन असे देणे बंधनकारक आहे.

पावसाळ्याच्या काळात अशुद्ध पाण्यामध्ये वाढलेली गढूळता कमी करण्यासाठी चालू निविदेतील पावडर स्वरुपातील पॉली ऍल्युमिनियम क्लोराईडचा ५०% वाढीव पुरवठा निविदा अटी व शर्तीप्रमाणे निविदा दराने घेणे आहे. त्याअनुषंगाने मे.एस.व्ही.एस. केमिकल कार्पोरेशन यांच्याकडून पावडर PAC च्या २०८.२० मे.टन परिमाणाच्या ५०% वाढीव पुरवठा म्हणजेच १०४.१० मे.टन पुरवठा घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा पुरवठा आदेशामधील दराप्रमाणे

१) एस.व्ही.एस. केमिकल कार्पोरेशन यांना ५०% वाढीव पावडर पॉली ऍल्युमिनियम क्लोराईड चे परिमाण (१०४ मे.टन) पुरविणेचा आदेश देणे आवश्यक असल्याने त्यास होणारा एकूण खर्च (१०४ मे.टन X र.रु.३१,१५०/- प्रति मे.टन = र.रु.३२,३९,६००/- इतका असून त्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

पावसाळ्यातील जास्तीचा गढूळपणा कमी करण्यासाठी पावडर स्वरुपातील पी.ए.सी चा पुरवठा घेणेची निकड लक्षात घेता उपरोक्त १ प्रमाणे मे.एस.व्ही.एस. केमिकल कार्पोरेशन यांना ५०% वाढीव परिमाणाचे पुरवठा आदेश ठेकेदारास देणेकरिता व त्यास होणा-या खर्चास र.रु.३२,३९,६००/- यांस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०५३ विषय क्रमांक – ५३
दिनांक – २१/०७/२०१५ विभाग – फ प्रभाग स्थापत्य
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.शांताराम भालेकर
संदर्भ:- मा.संध्या गायकवाड, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...

फ प्रभाग मुख्यालयामध्ये सन २०१५-१६ च्या अंदाजामध्ये कामाच्या तरतुदीमध्ये प्रस्तावात नमुदप्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रु.९,२५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्रमांक –१२०५४ विषय क्रमांक – ५४
दिनांक – २१/०७/२०१५
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ:- मा.शांताराम भालेकर, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव...

पिं.चिं. मनपाचे तळवडे गट नं.१ येथे मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केलेले आहे. वृक्षारोपण कामकाजामध्ये स्थानिक संस्था, मंडळे इ.चा सहभाग असणे आवश्यक आहे. याचा विचार करुन

स्थानिक संस्था एस.के. बापू फाऊंडेशन तळवडे या संस्थेस त्यांचा पुर्वानुभव विचारात घेता त्यांस सध्याचे दराने व अटीशर्तीनुसार पुढील तीन वर्षे कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७२/२०१५
दिनांक - २१/०७/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(विषय पत्र क्र.क्रीडा/०८/कावि/४५/२०१५ दिनांक-२५/०५/२०१५ ठराव क्रमांक १०९, दिनांक - १५/०७/२०१५ चे लगत)**

**प्रपत्र अ**

१) **क्रीडा धोरणामध्ये, आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे या मध्ये** म.न.पा. परिसरातील जे खेळाडू एशियन, राष्ट्रकुल, कॉमनवेल्थ ऑलिपिंक अशा नामांकित आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतात. अशा खेळाडूंना प्रवास खर्चासाठी विमान भाड्याच्या ५०% किंवा किट चार्जेस, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. करीता कमाल रू.२०,०००/- देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये बदल करून खेळाडूंना प्रवासखर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इ. खर्चाच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रू.१,००,०००/- अर्थसहाय्य देण्यात येते. त्यानुसार म.न.पा.परिसरातील नागरिक, क्रीडा प्रेमी व म.न.पा.अधिकारी,कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता र.रु.१,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा केले जाईल. निमंत्रित स्पर्धेसाठी जाणा-या आंतरराष्ट्रीय खेळाडूसाठी सदर आर्थिक सहाय्य देय राहणार नाही. महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार अथवा पिंपरी चिंचवड म.न.पा. यापैकी एकाच प्राधिकृत संस्थेकडून स्पर्धा प्रवास, निवास, भोजन खर्च देय राहिल. तसे लेखी पत्र संबंधित राज्य, राष्ट्रीय क्रीडा संघटनेकडून देणे बंधनकारक राहिल.असे नमूद आहे. त्यानुसार म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी,कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य अदा केले जाईल.

२) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता निवड झाल्याचे इंडिअन माउंटेनिअरिंग फौंडेशन, यांचे पत्र असणे आवश्यक आहे.

३) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य साठी विहित नमुन्यात अर्ज सदर करताना अर्जासोबत पास पोर्ट, बँक पासबुक, स्वतःचे पॅन कार्ड ई.च्या झेरॉक्स सत्यप्रत करून जोडणे आवश्यक आहे.

४) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक यांनाच गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक साहाय्य केले जाईल. याकामी अर्जदार हे पिंपरी चिंचवड म.न.पा. हद्दीतील किमान ५ वर्षे रहिवासी असणे आवश्यक आहे. याबाबत अर्ज सोबत वास्तव्याचे (आधारकार्ड,रेशन कार्ड) पुरावे सादर करणे आवश्यक आहे.

५) म.न.पा.अधिकारी अथवा कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक साहाय्य केले जाईल .याकामी अर्जदार यांनी पिंपरी चिंचवड म.न.पा. ची सलग ५ वर्षे सेवा पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे.याबाबत संबंधित कागदपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. उदा.म.न.पा.सेवेत नियुक्तीचे आदेश,शाखाप्रमुखाची शिफारस, आधारकार्ड, रेशन कार्ड इ.

६) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता ५ वर्षातून एकदाच आर्थिक सहाय्य केले जाईल.

७) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता अर्जदारांचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

८) म.न.पा.परिसरातील नागरिक,क्रीडा प्रेमी व म.न.पा.अधिकारी,कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता किमान ३० दिवस अगोदर विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

९) अर्जामध्ये दिलेली माहिती चुकीची आढळल्यास आर्थिक सहाय्य दिले जाणार नाही. फसवणूक करून आर्थिक सहाय्य घेतल्यास कायदेशिर कारवाई करून वसूल केली जाईल

१०) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य घेणेपुर्वी संबंधित खेळाडूने र.रू.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर विहित नमून्यात करारनामा करून द्यावा लागेल.

११) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य घेतल्यानंतर मोहिमेहून आल्यानंतर दिलेल्या आर्थिक सहाय्याचा विनियोग दाखला,त्याबाबतची मूळ बिले सादर करणे आवश्यक राहील.

१२) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता सदर आर्थिक सहाय्याचा लाभ भारत सरकार,महाराष्ट्र शासन अथवा महानगरपालिका एका संस्थेकडूनच घेता येईल याबाबत लेखी हमी पत्र द्यावे लागेल.

१३) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता जाणे पूर्वी अथवा जाऊन आल्यानंतर एकदाच आर्थिक साहाय्य अदा केले जाईल.

१४) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता आर्थिक सहाय्य बाबत अर्ज करताना त्यांनी यापूर्वी पूर्ण केलेल्या गिर्यारोहण मोहिमेची आवश्यक ती कागदपत्रे प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१५) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमेकरिता स्वतःच्या जबाबदारीवर जावे लागेल.मोहिमेवर जाताना अथवा येताना काही नैसर्गिक आपत्ती आल्यास,भूकंप,दरड कोसळणे,पूर प्रलय आल्यास,जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

१६) म.न.पा.परिसरातील गिर्यारोहक व म.न.पा.अधिकारी, कर्मचारी यांना गिर्यारोहण मोहिमे करिता आवश्यक तो पत्र व्यवहार, याकामी लागणारी कागद पत्रे यांची पूर्तता संबंधित गिर्यारोहक यांनी वेळेत करणे आवश्यक आहे.

सही/-

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४१११०१८